भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०१३-१४/१०८**
**एमपीडी. क्र. ३६६/०७.०१.२७९/२०१३-१४** **जुलै १, २०१३**
**आषाढ १०, १९३५ (श)**

**अध्यक्ष//मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सर्व शेड्युल्ड कमर्शियल बँका (आरआरबी सोडून)**

**महोदय/महोदया,**

**महापरिपत्रक निर्यात कर्ज पुनर्वित्त सेवा**

कृपया वर दिलेल्या विषयावरील, महापरिपत्रक क्र.एमपीडी क्र.३५६/०७.०१.२७९/२०१२-१३ दिनांक जुलै २, २०१२ चा संदर्भ घ्या. महापरिपत्रक निर्यात कर्ज पुनर्वित्त सेवा याची अद्यावत प्रत आणि या विषयावरील जुन ३०, २०१३ पर्यंतची सूचना/मार्गदर्शके एकत्रितपणे दिलेली आहेत. या विषयावरील सूचना/मार्गदर्शके स्वतंत्रपणे परिशिष्टामध्ये दिलेली आहेत. हे महापरिपत्रक रिझर्व बँकेच्या वेबसाईट(http://www.rbi.org.in). वर देण्यात आले आहे

आपला,

(मायकेल देवव्रत पात्रा)
**प्रमुख सल्लागार**

**सहः** वरील प्रमाणे

**महापरिपत्रक निर्यात कर्ज पुनर्वित्त सेवेसाठीची**


| अनुक्रमणिका | | |
|---|---|---|
| **परिच्छेद/क्र** | **माहिती** | **पान क्र.** |
| १. | प्रस्तावना | ३ |
| २. | पात्र संस्था | ३ |
| ३. | मर्यादा | ३ |
| ४. | व्याज दर | ३ |
| ५. | सीमान्तिक आवश्यकता | ३ |
| ६. | कालावधी | ३ |
| ७. | सांपार्श्विक | ३ |
| ८. | मिळविण्याची नफ्याची किमान रक्कम | ४ |
| ९. | मिळविण्याचे नफ्याचे स्थान | ४ |
| १०. | दंड | ४ |
| ११. | कागदपत्रांची पूर्तता (डॉक्युमेंटेशन) | ४ |
| १२. | अहवालाची आवश्यकता | ५ |
| १३. | अट | ५ |
| १४. | जोडपत्र | ५ |
| १५. | परिशिष्ट | ५ |
| जोडपत्र १ | व्याख्या | ६ |
| जोडपत्र २ | करारासाठीचा नमुना | ७ |
| जोडपत्र ३ | अहवालाचा नमुना | १२ |
| परिशिष्ट | परिपत्रकाची यादी | १४ |

**महापरिपत्रक निर्यात कर्ज पुनर्वित्त सेवा (ईसीआर)**

## १. प्रस्तावना

१.१ भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या कलम १७ (३ए) अंतर्गत असलेल्या बँकांना भारतीय रिझर्व बँक (आरबीआय) निर्यात कर्ज पुनर्वित्त सेवा देते. पाठवण्या आधीच्या आणि पाठवल्यानंतरच्या अशा दोन्ही टप्प्यांवरील बँकेच्या रूपयाच्या निर्यातीच्या न फेडलेल्या कर्जाच्या पात्र किमतीच्या आधारे ही सेवा दिली जाते. पुनर्वित्त सेवेचे प्रमाण रिझर्व बँकेच्या आर्थिक धोरणानुसार वेळोवेळी निर्धारित केले जाते.

## २. पात्र संस्था

२.१ परकीय विनिमयामध्ये अधिकृत वितरक असलेल्या आणि निर्यात कर्ज विस्तारित केलेल्या (आरआरबीज वगळता) सर्व अनुसूचित बँका निर्यात कर्ज पुनर्वित्त सेवा मिळण्यास पात्र आहेत.

## ३. मर्यादा

३.१ सध्या, अनुसूचित बँकांना, दिले जाणारे एक्सपोर्ट क्रेडिट रिफायनान्स हे, मागील दुस-या पंधरवड्याच्या अखेरीस असलेल्या व पुनर्वितासाठी पात्र असलेल्या आऊटस्टँडिंग एक्सपोर्ट क्रेडिटच्या ५० टक्क्यांपर्यंत एवढे आहे. ही मर्यादा आता, जून ३०, २०१२ पासून सुरु होणा-या पंधरवड्यापासून, निर्यात क्षेत्राला कर्ज पुरवठा वाढविण्यासाठी, १५.० टक्क्यांपासून ५०.० टक्के एवढी करण्यात आली आहे. पुनर्वित्तासाठी पात्र असलेल्या आऊटस्टँडिंग निर्यात कर्जाची व्याख्या जोडपत्र १ मध्ये दिली आहे

## ४. व्याज दर

४.१ वेळोवेळी घोषित केल्या जाणाऱ्या तरलता समायोजन सुविधा (एलएएफ) अंतर्गत कर्ज देण्याच्या दरानुसार निर्यात कर्ज पुनर्वित्तसेवा उपलब्ध आहे.

४.२ मासिक विरामासह व्याज देय असेल आणि अशा व्याजांचे प्रमाण दैनंदिन जमा रकमेच्या आधारे निर्धारित केले जाईल आणि त्या त्या महिन्याच्या शेवटी किंवा जर परतफेड बाकी असलेली रक्कम संपुष्टात आली तर त्या आधी ह्या पद्धतीने ती खात्यामधून काढली जाईल.

## ५. **सीमान्तिक आवश्यकता**/मार्जिनची आवश्यकता

५.१ कोणतेही मार्जिन आवश्यक नाही.

## ६. कालावधी

६.१ ईसीआर हे मागणीनुसार किंवा १८० दिवसांहून अधिक नसलेल्या नियत कालावधीच्या समाप्तीनंतर पुनः देय आहे. मात्र किमान मुदत/कालावधी एक दिवसाचा असला पाहिजे.

## ७. सांपार्श्विक (कोलॅटरल)

७.१ आरबीआय अशा बँकांना डिमांड प्रॉमिसरी नोट(डीपीएन)पासून निर्यात कर्ज पुनर्वित्तसेवा देते, ज्यांनी असे घोषित केले असेल, की त्यांनी निर्यात कर्ज विस्तारित केली आहे आणि पुनर्वित्तसेवेसाठी पात्र असलेली परतफेड न केलेली रक्कम आरबीआयकडून दिल्या गेलेल्या कर्जाहून/अग्रिम रकमेहून कमी नाही.

## ८. मिळविण्याची नफ्याची किमान रक्कम

८.१ ह्या सुविधे अंतर्गत असलेली मिळविण्याची नफ्याची किमान रक्कम एक लाख रूपये व त्याच्या पटीमध्ये आहे.

## ९. मिळविण्याचे नफ्याचे स्थान

९.१ जिथे जिथे रिझर्व बँकेचा बँकिंग विभाग आहे, तिथे तिथे ह्या सुविधेचा लाभ घेतला जाऊ शकतो.

## १०. दंड

१०.१ निर्यात कर्ज पुनर्वित्तसेवेचा अनियमित लाभ घेत असलेल्या अनुसूचित बँकेच्या संदर्भात वेळोवेळी रिझर्व बँकेद्वारे घोषित करण्यात येणारा व्याजाचा दंड दर न फेडलेल्या कर्जावर किंवा कर्जांवर लागू केला जाईल.

१०.२ निर्यात कर्ज पुनर्वित्तसेवेच्या अनियमित लाभ घेण्याबाबत कोणत्या परिस्थितीमध्ये दंड दर लागू होऊ शकेल, ह्याची वर्णनात्मक (परंतु मर्यादित नसलेली) सूची पुढे दिलेली आहे.

अ. ईसीआरचा वापर एकूण मर्यादेपेक्षा अधिक झाला.

ब. बँकांद्वारे पुनर्वित्तसेवा मर्यादेची गणना/माहिती चुकीची केली गेली.

क. १८० दिवसांमध्ये पुनर्वित्तसेवेची परतफेड केली नाही.

ड. बँकांद्वारे अतिरिक्त वापराची माहिती देण्यामध्ये उशीर झाला.

## ११. कागदपत्रांची पूर्तता (डॉक्युमेंटेशन)

११.१ निर्यात कर्ज पुनर्वित सेवा मिळविण्यासाठी बँकांना पुढील कागदपत्रे सादर करावी लागतील. (जोडपत्र २)

अ. फॉर्म क्र. २९७ मधील डीएडी २९७ च्या स्वरूपातील स्टँप असलेले करारपत्र

ब. फार्म क्र. २९५ अ मधील डिमांड प्रॉमिसरी नोटडीएडी २९५ ए च्या स्वरूपातील मागणी अनुमती सूचना (डीपीएन)

क. फॉर्म क्र.डीएडी २९८ मधील मंडळाचा ठराव ज्याद्वारे ह्या योजनेमधून कर्ज घेण्यास मान्यता दिली गेली आहे आणि बँकेच्या वतीने कर्जाच्या कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अधिकृत केले गेले आहे.

ड. मर्यादा वाढविण्यासाठी, फॉर्म क्र डीएडी २९९ मधील (ज्यावर एक करारनामा म्हणून शिक्कामोर्तब केले जाईल) तो करारनामा वाढविलेल्या मर्यादेत असण्याबाबतचे एक पत्र, व त्या नवीन मर्यादेसाठीची प्रॉमिसरी नोटसह सादर केले जाईल.
कर्जदार बँकेच्या आऊटस्टँडिंग एक्सपोर्ट क्रेडिटबाबतच्या अग्रिम राशींखाली असलेल्या कर्जांच्या स्थितीवर नजर ठेवता यावी ह्यासाठी, कर्जदार बँकेने, रिझर्व बँकेकडे, फॉर्म क्र. डीएडी ३८९ (जोडपत्र ३) मध्ये एक पाक्षिक घोषणापत्र सादर करावे.

ई. बँकिंग विभागाच्या नियमावलीतील परिच्छेद ७.३० च्या संदर्भात जोपर्यंत त्यातील अटींमध्ये बदल होत नाही, तोपर्यंत विस्ताराच्या करारांना व पत्रांना पुनः नवे करून घेण्याची गरज नाही. तथापि, कर्जदार बँकांनी दिलेल्या प्रॉमिसरी नोटांचे येणे (आऊटस्टँडिंग) कितीही असले तरी, त्यांच्या अंमलबजावणीच्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत त्यांचे नूतनीकरण करण्यात यावे.

## १२.    अहवाल देण्याची आवश्यकता

परिशिष्ट ३ मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार संबंधित तारखेपासून पाच दिवसांच्या आत पुनर्वित्तसेवेसाठी पात्र असलेल्या त्यांच्या परतफेड न केलेल्या निर्यात कर्जाची माहिती देणे लाभ घेणाऱ्या बँकांसाठी आवश्यक आहे.

## १३.    अट

१३.१    त्यांच्या अद्ययावत उद्घोषणेमध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या पाठवण्याआधीच्या पात्र निर्यात बिलांबद्दल/ रकमेसाठी अग्रिम कर्ज घेणाऱ्या बँकांद्वारे परतफेड न केलेली रक्कम नेहमी सुरक्षित केली गेलेली असावी. जर कधी असे आढळले, की बँकांकडे असलेली एकूण रक्कम/घोषणेनुसार संरक्षित केली गेलेल्या पाठवण्याच्या आधीच्या अग्रिम रकमेचे बिल कर्ज घेतलेल्या रकमेपेक्षा कमी आढळले, तर बँकांनी त्यानंतर आरबीआयद्वारे पुनर्वित्तसेवा देण्यातील रक्कम जुळवून घ्यावी किंवा भरावी.

## १४. जोडपत्र

१४.१ निर्यात कर्ज पुनर्वित्तसेवेशी संबंधित व्याख्या, करारनामा पत्रक आणि अहवालाचे नमुने अनुक्रमे जोडपत्र १, जोडपत्र २ आणि जोडपत्र ३ मध्ये देण्यात आलेले आहेत.

## १५. परिशिष्ट

१५.१ भारतीय रिझर्व बँकेकडून प्रसारित करण्यात आलेले निर्यात कर्ज पुनर्वित्तसेवेशी संबंधित सर्व सूचनापत्रके परिशिष्टामध्ये देण्यात आलेली आहेत.

## जोडपत्र १

### व्याख्या

i. ह्या मार्गदर्शक सूचनांमध्ये, संदर्भामध्ये अन्य अर्थ आवश्यक असल्याखेरीजः

ii. ''पंधरवडा'' ह्याचा अर्थ शनिवारपासून पुढील दुस-या शुक्रवारपर्यंतचा कालावधी ह्या दोन्ही दिवसांच्या समावेशासह असेल.

iii. ''अनुसूचित बँक'' ह्याचा अर्थ भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या नुसार दुसऱ्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेली बँक होय.

iv. ''निर्यात बिले'' म्हणजे अशी सर्व निर्यात बिले जी भारतामध्ये काढण्यात आली किंवा आंतराष्ट्रीय नाणेनिधीच्या कोणत्याही सदस्य राष्ट्रामध्ये काढण्यात आली किंवा रिझर्व बँकेने भारताच्या राजपत्रामध्ये अधिसूचित केलेल्या कोणत्याही देशामध्ये कर्जाच्या आधारे किंवा अन्य प्रकारे १८० दिवसांपर्यंत असलेल्या विक्रीच्या/विनिमयाच्या किंवा सवलतीच्या आधारे कर्ज घेणाऱ्या बँकेकडून काढण्यात आली असतील आणि त्या बँकेद्वारे करण्यात येणाऱ्या घोषणेमध्ये समाविष्ट करण्यास पात्र असतील.

v. ''माल पाठवतानाचे कर्ज (प्री-शिपमेंट)'' म्हणजे बँकांद्वारे प्रामाणिक निर्यातदारांना योग्य स्थितीतील विदेशी बँकांद्वारे स्थानिक निर्यातदाराला किंवा निर्यात करणाऱ्या संस्थेच्या सक्षमतेनुसार कर्जाच्या कागदपत्राच्या आधारे मान्य केले जाणारे कर्ज होय, व ज्यामध्ये कर्ज देणाऱ्या बँकेस संबंधित कागदपत्रे प्राप्त करणे आवश्यक असते.

vi. पुनर्वित्तासाठी पात्र असलेले निर्यात कर्ज म्हणजे, अहवाल पाठविण्याच्या, मागील दुस-या पंधरवड्याच्या शेवटच्या शुक्रवारी थकित (आऊटस्टँडिंग) असलेले एकूण निर्यात कर्ज, वजा, माल पाठविण्यापूर्वी असलेले विदेशी मुद्रेतील कर्ज (पीसीएफसी), रिडिसकाऊंटिंग ऑफ एक्सपोर्ट बिल्स ॲबरॉड (ईबीआर), रुपयांमधील थकित निर्यात कर्ज व पुनर्वित्तासाठी पात्र नसलेले इतर निर्यात कर्ज, इतर बँका/एक्झिम बँक/वित्तसंस्था ह्यामध्ये रिडिसकाऊंट केलेली निर्यात बिले आणि नाबार्ड/एक्झिम बँक मधून ज्यांच्या विरुध्द पुनर्वित घेण्यात आले आहे असे निर्यात कर्ज.

**जोडपत्र २**

**करारासाठीचा नमुना**

**डीएडी २९७**
**परिच्छेद ७.५०**

निर्यातीसाठीच्या सामानाच्या बँकेच्या सहाय्याच्या संदर्भात कर्ज घेण्यासाठी अनुसूचित बँकेच्या मुख्य कार्यालयातून प्राप्त करण्यात येणारा नमुना (प्रत्येक राज्यामध्ये लागू असलेल्या कायद्यानुसार करार म्हणून सत्यापित करण्यात येणारा)

रिझर्व बँक ऑफ इंडिया

महोदय,

भारतीय रिझर्व बँक अधिनियमाच्या कलम १७ (३ए) अंतर्गत डीबीओडी क्रमांक बीएम ७८/सी २९७ (एम)- ६९ दिनांक २० जानेवारी १९६९ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी आणि शर्तींनुसार वेळोवेळी पुढील रक्कम आपल्या स्वयंनिर्णयाच्या आधारे परंतु रूपये .................. च्या मर्यादेमध्ये (व्याजा व्यतिरिक्त) देण्याच्या आपल्या सहमतीनुसार आम्ही आपल्याला आपल्यासाठी पुढे दिलेल्या व्याज दरासह आपल्याला प्रॉमिसरी नोट देत आहोत; ह्या व्याजदराचे अग्रिम भाग मागणीसह परताव्यास पात्र राहतील आणि आपल्याकडून अशा पत्रकांमध्ये निर्धारित करण्यात येणाऱ्या घोषणेप्रमाणे दिले जातील. पुढीलप्रमाणे आम्ही सहमत आहोत.

(१) मागणी केल्यानंतर कधीही वर उल्लेखलेल्या अग्रिम राशीमधील परतफेड बाकी असलेली रक्कम आपल्याला देणे आमच्यासाठी आवश्यक असेल.

(२) ह्या करारामधील अग्रिम राशीच्य प्रत्येक निकासी (ड्रॉवल) साठी, १८० दिवसांपेक्षा अधिक नसलेला परिपक्वता काल असेल आणि त्या कालावधीत ती रक्कम आमच्याकडून देय राहील.

(३) वेळोवेळी आपल्याकडून सूचित करण्यात येणाऱ्या व्याज दरानुसार मासिक अवकाशासह आपल्याला व्यज देणे आमच्यासाठी आवश्यक राहील. आणि दैनिक शिल्लक रकमेवर बनणाऱ्या अशा व्याजाच्या एकूण रकमांना त्या त्या महिन्याच्या समाप्तीस किंवा शिल्लक रक्कम संपल्यास त्या आधी वर उल्लेखलेल्या अग्रिम राशीच्या खात्यातून काढण्यात येऊ शकेल. अशा प्रकारे काढण्यात आलेली व्याजाची रक्कम आपल्याकडे असलेले आमच्या चालू खात्यावर लागू करून परत जमा करण्याचा निर्णय आपल्याकडे असेल.

(४) विधान (१) आणि (२) मधील अटींनुसार इथून पुढे आमच्याकडून रक्कम जमा करण्यामध्ये कसूर झाल्यास, आपण स्वेच्छेने व कोणत्याही अनिवार्यतेसह आमच्या चालू खात्यामधून आमच्याकडून आपल्याला देय असलेली रक्कम वर उल्लेखलेल्या अधिनियमाच्या कलम १७ (३ए) नुसार अग्रिम राशीमधून काढू शकता.

(५) आम्ही वचन देतो आणि घोषित करतो, की आमच्याकडून निर्यातदार किंवा भारतामधून सामानाची निर्यात करण्यासाठी पुनर्वित्तसेवेसाठी पात्र असलेल्या इतर व्यक्तींना काढण्यासाठी किंवा परतफेड न केलेली रक्कम देण्यासाठी कोणत्याही वेळेस देऊ ते कर्ज/अग्रिम राशी आपल्याकडून आम्ही घेतलेल्या आणि परतफेड न केलेल्या कर्जापेक्षा किंवा अग्रिम राशीपेक्षा कमी असेल. तसेच, आपण ह्या संबंधात वेळोवेळी जी आवश्यक मार्जिन निर्धारित कराल, ती मान्य करण्यास आम्ही सहमत आहोत ज्याद्वारे आपल्यासाठी आमच्याकडून देय असलेली शिल्लक रक्कम आपल्या मागणीनुसार कमी करण्यासाठी आम्ही आपल्याकडे रोख रक्कम जमा करू, ज्यामुळे आवश्यक तितकी मार्जिन राखली जाईल.

(६) आपल्यानुसार आम्ही ह्यासाठीही सहमत आहोत, की ही अग्रिम राशी सुरु असेपर्यंत वेळोवेळी आणि जेव्हा जेव्हा आपल्यासाठी आवश्यक असेल, तेव्हा पुनर्वित्तसेवेसाठी पात्र सामानाच्या संदर्भात आमच्याकडून आऊटस्टँडिंग असलेल्या अग्रिम राशीबद्दल माहिती दिली जाईल आणि कर्जदारांच्या कर्ज- स्थितीबद्दल आपण सूचित कराल ते सत्य अहवाल आपल्याला देण्यात येतील आणि ज्याद्वारे आपल्या सुरक्षिततेला क्षति पोचू शकण्याची शक्यता असेल, अशा कर्जदारांच्या स्थितीतील प्रत्येक बदलाबद्दल आपल्याला ताबडतोब कळविण्यास सहमत आहोत, सल्ला देण्यास सहमत आहोत.

(७) आपल्यासाठी पुनर्वित्तसेवेसाठी पात्र असलेल्या सामानाच्या निर्यातीच्या संदर्भात आम्ही दिलेल्या अग्रिम राशीला दर्शवणाऱ्या आमच्या कर्ज पुस्तिकेवर एक सर्वसाधारण अधिभार लावण्यासाठी किंवा आपल्याद्वारे निश्चित केली गेलेली सुरक्षितता बाळगण्यासाठी आम्ही आपल्या मागणीनुसार अशा कागदपत्रांना सादर करण्यास सहमती देत आहोत व ही कागदपत्रे आपल्याद्वारे केव्हाही विकत दिली जाऊ शकतील किंवा हस्तांतरित केली जाऊ शकतील.

(८) पुढील परिस्थितीमध्ये आपण निर्धारित केलेला अधिक व्याज दर देण्यासाठी आम्ही सहमती घोषित करत आहोतः

अ) निर्यात कर्ज पुनर्वित्तसेवा वापर हा मान्यताप्राप्त मर्यादेहून अधिक असेल;
(ब) पुनर्वित्तसेवेच्या मर्यादांची गणना किंवा माहिती चुकीच्या पद्धतीने दिली गेली असेल;
(क) देय रक्कम १८० दिवसांपेक्षा जास्त काळ अपुऱ्या निधीच्या कारणामुळे आमच्या खात्यामध्ये परतफेड न करता बाकी राहिली;
(ड) उशीर झालेल्या कालावधीमध्ये अतिरिक्त किंवा अनियमित वापराबद्दल माहिती देण्यामध्ये आमच्याकडून दीर्घकाळ उशीर झाला.

(९) आम्ही ह्यासाठीसुद्धा सहमत आहोत, की हा करार आणि वर उल्लेखलेले रूपये .................. साठीची डिमांड प्रॉमिसरी नोट वर उल्लेखलेल्या अग्रिम राशीसाठी चालू सुरक्षा म्हणून कार्यरत राहील आणि ती कोणत्याही वेळेस कर्जाच्या शिलकीच्या अस्तित्वाशिवाय किंवा कोणत्याही आंशिक रकमेशिवाय किंवा खात्यांमधील बदलांशिवाय किंवा सुरक्षेतील कोणताही भाग काढून घेतल्यानंतरही लागू राहील.

आपला

च्या साठी आणि च्या तर्फे ...............................
(शेड्युल्ड बँकेचे नाव)
(अधिकृत अधिकाऱ्यांची सही)
(हुद्दा)

जागाः

दिनांकः

**डीएडी २९५ए**

(लेटर हेड वर)

**डिमांड प्रॉमिसरी नोट**
**(निर्यात कर्ज पुनर्वित्त सुविधा)**

मागणी केल्यावर, आम्ही (बँकेचे नाव), भारतीय) रिझर्व बँकेस किंवा तिच्या आदेशानुसार रू. ................ (रूपये ................................) देण्याचे वचन देता ज्यामध्ये भारतीय रिझर्व बँकेने निर्यात कर्ज पुनर्वित्तसेवेसाठी मिळालेल्या किमतीनुसार कोणत्याही वेळेस संपूर्ण परतफेड किंवा मासिक हप्त्यांमधील परतफेड ह्यापैकी आधी होणाऱ्या स्थितीसाठी जाहीर केलेले व्याज दर (रेपो रेट) समाविष्ट आहेत.

जागाः ज्यासाठी आणि ज्याकडून............

दिनांकः

(२ स्वाक्षरीकर्ते व रेव्हेन्यु स्टँप)
सह्या करणा-या दोघांचीही नावे
व हुद्दे.

**डीएडी-२९८**
**परिच्छेद ७.७१**

## मंडळाचा ठराव नमूना

.......................... रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत पारित झालेल्या ठराव क्र. --------- ची प्रत.

पारित करण्यात आले की,

(i) भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या अंतर्गत कलम १७ (३ए) नुसार माल पाठवण्याच्या आधीच्या योजनेनुसार आणि/ किंवा निर्यात बिल कर्ज योजनेनुसार बँक भारतीय रिझर्व बँकेकडून कर्ज घेईल व त्याची मर्यादा भारतीय रिझर्व बँकेद्वारे वेळोवेळी निर्देशित केलेल्या अटींनुसार आणि शर्तींनुसार निर्धारित केली जाईल.

(ii) भारतीय रिझर्व बँकेकडून वर उल्लेखलेल्या सुविधा प्राप्त करण्यासाठी बँकेच्या वतीने बँकेच्या पुढील अधिकाऱ्यांना ह्या ठिकाणी विशेष करून आवश्यक त्या तरतुदी, करार, कर्ज कागदपत्रे, घोषणापत्रे, विधाने आणि प्रमाणपत्रे तयार करण्यासाठी आणि ह्या संदर्भात भारतीय रिझर्व बँकेद्वारे आवश्यक असतील त्या अन्य दस्तऐवज आणि कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी अधिकृत केले जात आहे.

**फॉर्म 'डी'**
**डीएडी -२९९**

दिनांकः

रिझर्व बँक ऑफ इंडिया
ठेवी खाते विभाग
मुंबई-४०० ००१

महोदय,

दि ...... च्या संदर्भातील करारनाम्यानुसार, त्यातील रु .......(रुपये......) ची मर्यादा, रु...... (रुपये.........) पर्यंत वाढविण्याबाबतच्या, ज्यासाठी आम्ही द. सा.द.शे...... दराने मंथली रेस्टने व्याज असलेली एक एकत्रित प्रॉमिसरी नोट दिली आहे) आपल्या संमतीचा विचार करुन, आम्ही घोषित करतो की, ह्या नव्या मर्यादेबाबत ह्या करारनाम्यानुसार केलेल्या रु ......... (रुपये........) च्या एकत्रित प्रॉमेसरी नोटेला व त्याखालील अग्रिम राशींना ह्या करारनाम्यातील सर्व अटी लागु होतील.

आपला,

करिता व च्या वतीने
(शेड्युल्ड बँकेचे नाव)

**जोडपत्र ३**

**अहवालाचे नमुने**

**----------------------------------------------------------------------------------------------------फॉर्म डीएडी ३८९ बॅंकेचे नाव**

**………रोजी संपलेल्या पंधरवड्यासाठी निर्यात ऋण पुनर्वित्त मर्यादा दर्शविणारे विवरणपत्र**

**<u>भाग - ए</u>**

(रु लक्ष)

| | | |
|---|---|---|
| १. | अहवाल पाठविण्याच्या मागील दुस-या पंधरवड्यातील शेवटच्या शुक्रवारी येणे असलेले निर्यात ऋण * | ________________ |
| २. | निर्यात ऋण पुनर्वित्त मर्यादा (वरील बाब १ व्या ५०%) | ________________ |

---

* पुनर्वित मर्यादा काढण्यासाठी असलेले आउटस्टॅंडिंग निर्यात कर्ज म्हणजे, एकूण आउटस्टॅंडिंग कर्ज, **<u>वजा</u>** इतर बॅंका/एक्झिम बॅंक/वित्तसंस्था, ह्यांचेकडे रिडिस्काउंट केलेली निर्यात बिले, (ज्यांच्या विरुध्द नाबार्ड/एक्झिम बॅंक ह्यांचे कडून पुनर्वित्त घेतले आहे), विदेशी मुद्रेतील प्रिशिपमेंट कर्ज, 'विदेशातील निर्यात बिलांचे डिस्काउंट करणे/रिडिस्काउंट करणे' योजनेखाली डिस्काउंट/रिडिस्काउंट केलेली निर्यात बिले, मुदतबाह्य रुपये निर्यात कर्ज व पुनर्वित्तासाठी पात्र नसलेले इतर निर्यात कर्ज.

**भाग - ब**

**@ रोजी येणे असलेले एकूण निर्यात ऋण**

| | (रु लक्ष) |
|---|---|
| १.एकूण येणे असलेले एकूण निर्यात ऋण | ...................................... |
| १ इतर बँका/एक्झिम बँक/वित्तीय संस्थामध्ये रिडिस्काउंट केलेली बिले | ...................................... |
| २ नाबार्ड/एक्झिम बँक ह्यांच्याकडून ज्या विरुध्द पुनर्वित घेतले आहे ते एक्सपोर्ट क्रेडिट | ...................................... |
| ३ विदेशी मुद्रेमधील प्रि-शिपमेंट कर्ज (पीसीएफसी) | ...................................... |
| ४ 'विदेशातील निर्यात बिलांच डिस्काउंटिंग' खाली डिस्काउंत/रिडिस्काउंट केलेली निर्यात बिले | ...................................... |
| ५ थकित झालेले रुपयातील निर्यात ऋण<br>वरीलसाठी हिशेबात अनुक्र. | ...................................... |
| ६ धरलेले निर्यात ऋण (१ ते ५) व पुनर्वित्तासाठी अपात्र असलेले निर्यात ऋण* | ...................................... |
| २ पुनर्वित्तासाठी पात्र असलेले थकित निर्माण ऋण (बाब १ **वजा** {(१) + (२) + (३) + (४) + (५) + (६)} | ...................................... |

**भाग - क**

**आजच्या निर्यात कर्जाचे येणे असलेले निर्यात ऋण @**

रु. लक्षमध्ये

१. प्रि-शिपमेंट रुपी निर्यात कर्ज**

(i) १८० दिवस पर्यंत

(ii) १८० दिवसांपलिकडील

एकुण (i+ii) ............

२. पोस्ट-शिपमेंट रुपी निर्यात कर्ज**

(iii) १८० दिवस पर्यंत

(iv) १८० दिवसांपलिकडील

एकुण (iii+iv) ............

३. एकूण निर्यात कर्ज रुपी (१+२) ............

@ अहवालाच्या दुस-या पंधरवड्याच्या शेवटच्या शुक्रवारी आउटस्टँडिंग असलेले एकूण निर्यात कर्ज.

* उदा. १८० दिवसांपेक्षा अधिक दिवसांनंतर परिपक्व होणारे अशी रुपयांमधील सर्व एक्सपोर्ट क्रेडिट्सच्या बाबतीत असलेले आऊटस्टँडिंग बाब १(६) मध्ये दाखविले जावे.

** ओव्हरड्युजसह.

**परिशिष्ट**
**परिपत्रकाची यादी**

| अनु. क्र . | परिपत्रक क्रमांक | विषय |
|---|---|---|
| १. | डीबीओडी.क्र .बीएम.२७३२/सी.२९७/के-६३ दिनांक मार्च १३, १९६३ | निर्यात बिलांची कर्ज योजना |
| २. | डीबीओडी.क्र .बीएम.७८/सी.२९७(एम)-६९ दिनांक जानेवारी २०, १९६९ | प्रि-शिपमेंट कर्जाचे पुनर्वित्त |
| ३. | डीबीओडी.क्र .बीएम.९३१/सी.२९७पी-६९ दिनांक जुन ९, १९६९ | भारतीय रिझर्व बँक ॲक्ट, १९३४, सेक्शन १७ (३ए) अंतर्गत पुनर्वित्त-प्रिशिपमेंट कर्ज योजना |
| ४. | सीपीसी.क्र .बीसी.४५/२७९ए-८१ दिनांक मार्च १८, १९८१ | निर्यात पुनर्वित्त. |
| ५. | सीपीसी.क्र .बीसी.४६/२७९ए-८१ दिनांक मे २७, १९८१ | निर्यात कर्ज पुनर्वित्त वर व्याज दर |
| ६. | सीपीसी.क्र .बीसी.६०/२७९ए-८२ दिनांक ऑक्टोबर २५, १९८२ | निर्यात कर्ज पुनर्वित्त वर व्याज दर मध्ये बदल |
| ७. | सीपीसी.क्र .बीसी.६४/२७९ए-८३ दिनांक ऑक्टोबर, १९८३ | निर्यात कर्ज पुनर्वित्त |
| ८. | सीपीसी.क्र .बीसी.७७/२७९ए-८५ दिनांक ऑक्टोबर २५, १९८५ | निर्यात कर्ज पुनर्वित्त |
| ९. | सीपीसी.क्र .बीसी.७९/२७९ए-८६ दिनांक ऑगस्ट १, १९८६ | निर्यात कर्ज पुनर्वित्त- व्याज दरात बदल |
| १०. | सीपीसी.क्र .बीसी.९१/२७९ए-८८ दिनांक एप्रिल २, १९८८ | निर्यात कर्ज पुनर्वित्त |
| ११. | सीपीसी.क्र .बीसी.९८/२७९ए-८९ दिनांक मार्च २७, १९८९ | निर्यात कर्ज पुनर्वित्त |
| १२. | सीपीसी.क्र .बीसी.१०३/२७९ए-९० दिनांक एप्रिल १२, १९९० | निर्यात कर्ज पुनर्वित्त |
| १३. | सीपीसी.क्र .बीसी.१११/२७९ए-९१ दिनांक एप्रिल १२, १९९१ | निर्यात कर्ज पुनर्वित्त |
| १४. | सीपीसी.क्र .बीसी.११५/२७९ए-९१ दिनांक सप्टेंबर ३, १९९१ | निर्यात कर्ज पुनर्वित्त |
| १५. | सीपीसी.क्र .बीसी.११६/२७९ए-९१ दिनांक ऑक्टोबर ८, १९९१ | निर्यात कर्ज पुनर्वित्त |
| १६. | सीपीसी.क्र .बीसी.१२२/२७९ए-९२ दिनांक एप्रिल २१, १९९२ | निर्यात कर्ज पुनर्वित्त (रुपी) वर व्याज दर आणि पोस्ट-शिपमेंट कर्जासाठी पुनर्वित्त युएस डॉलर्स मध्ये |
| १७. | सीपीसी.क्र .बीसी.१२३/२७९ए-९२ दिनांक एप्रिल २३, १९९२ | निर्यात कर्ज पुनर्वित्त (रुपी) आणि पोस्ट-शिपमेंटच्या विरुध्द कर्जासाठी पुनर्वित्त युएस डॉलर्स मध्ये |

| | | |
|---|---|---|
| १८. | सीपीसी.क्र .बीसी.१२९/०७.०१.२७९/९२-९३ दिनांक एप्रिल ७, १९९३ | निर्यात कर्ज पुनर्वित्त (रुपी) आणि पोस्ट-शिपमेंटच्या विरुध्द कर्जासाठी पुनर्वित्त युएस डॉलर्स मध्ये |
| १९. | सीपीसी.क्र .बीसी.१३२/०७.०१.२७९/९३-९४ दिनांक ऑक्टोबर ११, १९९३ | निर्यात कर्ज पुनर्वित्त (रुपी) आणि पोस्ट-शिपमेंटच्या विरुध्द कर्जासाठी पुनर्वित्त युएस डॉलर्स मध्ये |
| २०. | सीपीसी.क्र .बीसी.१३६/०७.०१.२७९/९३-९४ दिनांक मे १४, १९९४ | निर्यात कर्ज पुनर्वित्त (रुपी) आणि पोस्ट-शिपमेंटच्या विरुध्द कर्जासाठी पुनर्वित्त युएस डॉलर्स मध्ये |
| २१. | सीपीसी.क्र .बीसी.१४४/०७.०१.२७९/९४-९५ दिनांक एप्रिल १७, १९९५ | व्याज दर वरील टर्म डिपॉझिट्स |
| २२. | सीपीसी.क्र .३५५९/०३.०२.१५/९४-९५ दिनांक एप्रिल २०, १९९५ | निर्यात कर्ज पुनर्वित्त |
| २३. | युबीडी.डीएस.एसयुबीसीआयआर.३/१३.०४.००/९५-९६ दिनांक फेब्रुवारी ७, १९९६ | अग्रिम राशी वरील व्याजदर |
| २४. | सीपीसी.क्र .२१०१/०३.०२.०१/९५-९६ दिनांक जानेवारी १५, १९९६ | पोस्ट-शिपमेंटच्या विरुध्द कर्जासाठी पुनर्वित्त युएस डॉलर्स मध्ये (पीएससीएफसी) |
| २५. | सीपीसी. /०३.०२.०१/९५-९६ दिनांक फेब्रुवारी ७, १९९६ | निर्यात कर्ज पुनर्वित्त |
| २६. | सीपीसी.क्र .३४६६/०३.०२.०१/९५-९६ दिनांक एप्रिल ४, १९९६ | निर्यात कर्ज पुनर्वित्त |
| २७. | आयईसीडी.क्र .१०/०४.०२.०१/९६-९७ दिनांक ऑक्टोबर १९, १९९६ | अग्रिम राशी वरील व्याजदर- पोस्ट-शिपमेंट रुपी कर्ज |
| २८. | सीपीसी.क्र .१०६७/०३.०२.०१/९६-९७ दिनांक ऑक्टोबर २३, १९९६ | निर्यात कर्ज पुनर्वित्त |
| २९. | सीपीसी.क्र .२६५२/०३.०२.०१/९६-९७ दिनांक एप्रिल २१, १९९७ | निर्यात कर्ज पुनर्वित्त |
| ३०. | एमपीडी.क्र .२०३५/०३.०२.०१/९७-९८ दिनांक जानेवारी १६, १९९८ | रिझर्व बँकेकडून पुनर्वित्त |
| ३१. | सीपीसी.क्र .२६६२/०३.०२.०१/९७-९८ दिनांक मार्च १८, १९९८ | भारतीय रिझर्व बँकेकडून पुनर्वित्त सुविधावरील व्याज दर |
| ३२. | एमपीडी.क्र .२९३२/०३.०२.०१/९७-९८ दिनांक एप्रिल २, १९९८ | भारतीय रिझर्व बँकेकडून पुनर्वित्त सुविधावरील व्याज दर |

| | | |
|---|---|---|
| ३३. | एमपीडी.क्र .३१२१/०३.०२.०१/९७-९८ दिनांक एप्रिल २९, १९९८ | भारतीय रिझर्व बँकेकडून पुनर्वित्त सुविधा |
| ३४. | एमपीडी.बीसी.क्र .१७७/०७.०१.२७९/९७-९८ दिनांक जुन ११, १९९८ | निर्यात कर्जावरील व्याज दर |
| ३५. | एमपीडी.४९/०३.०२.०१/९८-९९ दिनांक, जुलै ८, १९९८ | निर्यात कर्ज पुनर्वित्त |
| ३६. | एमपीडी.बीसी.क्र .१७९/०७.०१.२७९/९८-९९ दिनांक ऑगस्ट ६, १९९८ | व्याज दर वर निर्यात कर्ज आणि निर्यात कर्ज पुनर्वित्त |
| ३७. | एमपीडी.क्र .१०१८/०३.०२.०१/९८-९९ दिनांक ऑक्टोबर १५, १९९८ | निर्यात कर्ज पुनर्वित्त मर्यादा दाखविणारे पाक्षिक विवरणपत्र |
| ३८. | एमपीडी.बीसी.क्र .१८२/०७.०१.२७९/९८-९९ दिनांक मार्च १, १९९९ | बँकेचा दर आणि निर्यात कर्ज पुनर्वित्त दर |
| ३९. | एमपीडी.बीसी.क्र .१८४/०७.०१.२७९/९८-९९ दिनांक मार्च १, १९९९ | व्याज दर वर निर्यात कर्ज आणि निर्यात कर्ज पुनर्वित्त |
| ४०. | एमपीडी.३२७८/०३.०२.०१/९९-२००० दिनांक एप्रिल १, २००० | निर्यात कर्ज पुनर्वित्त व तारणयुक्त कर्ज सुविधांवरील व्याजदर |
| ४१. | एमपीडी.३५३८/०३.०२.०१/९९-२००० दिनांक एप्रिल २७, २००० | उदारीकृत निर्यात कर्ज पुनर्वित्त सुविधा |
| ४२. | एमपीडी.बीसी.क्र .१९८/०७.०१.२७९/२०००-०१ दिनांक जुलै २१, २००० | बँकेचा दर |
| ४३. | एमपीडी.बीसी.क्र .२००/०७.०१.२७९/२०००-०१ दिनांक जुलै २१, २००० | निर्यात कर्ज पुनर्वित्त आणि तारणयुक्त कर्ज सुविधां |
| ४४. | एमपीडी.२९९२/०३.०२.०१/२०००-०१ दिनांक एप्रिल २१, २००० | स्थायी लिक्विडिटी सुविधा योजना |
| ४५. | एमपीडी.३११५/०३.०२.०१/२०००-०१ दिनांक एप्रिल ३०, २००१ | स्थायी लिक्विडिटी सुविधा योजना |
| ४६. | एमपीडी.बीसी.क्र .२१३/०२.०१.२७९/२००१-०२ दिनांक मार्च १८, २००२ | निर्यात कर्ज पुनर्वित्त योजना |
| ४७. | एमपीडी.बीसी.क्र .२२३/०७.०१.२७९/२००२-०३ दिनांक ऑक्टोबर २९, २००२ | निर्यात कर्ज पुनर्वित्त सुविधा |

| | | |
|---|---|---|
| ४८. | एमपीडी.बीसी.क्र .२३२/०७.०१.२७९/२००२-०३ दिनांक एप्रिल २९, २००३ | निर्यात कर्ज पुनर्वित्त सुविधा |
| ४९. | एमपीडी.बीसी.क्र .२४३/०७.०१.२७९/२००३-०४ दिनांक नोव्हेंबर ५, २००३ | स्थायी सुविधे चे पुनःसंघटन |
| ५०. | एमपीडी.बीसी.क्र .२४६/०७.०१.२७९/२००३-०४ दिनांक मार्च २५, २००४ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी निर्यात कर्जासाठी आणि प्राथमिक डीलर्स (पीडी): पुनःसंघटन |
| ५१. | एमपीडी.बीसी.क्र .२४७/०७.०१.२७९/२००३-०४ दिनांक एप्रिल ०७, २००४ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी निर्यात कर्जासाठीः पुनःसंघटन |
| ५२. | एमपीडी.बीसी.क्र .२५२/०७.०१.२७९/२००४-०५ दिनांक जुलै ०३, २००४ | निर्यात कर्ज पुनर्वित्त सुविधा या वर महापरिपत्रक |
| ५३. | एमपीडी.बीसी.क्र .२७०/०७.०१.२७९/२००५-०६ दिनांक जुलै ०१, २००५ | निर्यात कर्ज पुनर्वित्त या वर महापरिपत्रक |
| ५४. | एमपीडी.बीसी.क्र .२७५/०७.०१.२७९/२००५-०६ दिनांक ऑक्टोबर २५, २००५ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स (पीडी) |
| ५५. | एमपीडी.बीसी.क्र .२७८/०७.०१.२७९/२००५-०६ दिनांक जानेवारी २४, २००६ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स (पीडी) |
| ५६. | एमपीडी.बीसी.क्र .२८१/०७.०१.२७९/२००५-०६ दिनांक जुन ९, २००६ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स (पीडी) |
| ५७. | एमपीडी.क्र .२८२/०७.०१.२७९/२००६-०७ दिनांक जुलै १२, २००६ | निर्यात कर्ज पुनर्वित्त या वर महापरिपत्रक |
| ५८. | एमपीडी.बीसी.क्र .२८४/०७.०१.२७९/२००६-०७ दिनांक जुलै २५, २००६ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ५९. | एमपीडी.बीसी.क्र .२८७/०७.०१.२७९/२००६-०७ दिनांक ऑक्टोबर ३१, २००६ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ६०. | एमपीडी.बीसी.क्र .२८९/०७.०१.२७९/२००६-०७ दिनांक जानेवारी ३१, २००७ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ६१. | एमपीडी.बीसी.क्र .२९०/०७.०१.२७९/२००६-०७ दिनांक मार्च ३०, २००७ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ६२. | एमपीडी.बीसी.क्र .३००/०७.०१.२७९/२००७-०८ दिनांक जुन ११, २००८ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |

| | | |
|---|---|---|
| ६३. | एमपीडी.बीसी.क्र .३०१/०७.०१.२७९/२००७-०८ दिनांक जुन २४, २००८ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ६४. | एमपीडी.बीसी.क्र .३०४/०७.०१.२७९/२००८-०९ दिनांक जुलै २९, २००८ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ६५. | एमपीडी.बीसी.क्र.३०५/०७.०१.२७९/२००८-०९ दिनांक ऑक्टोबर २०, २००८ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ६६. | एमपीडी.बीसी.क्र .३०८/०७.०१.२७९/२००८-०९ दिनांक नोव्हेंबर ३, २००८ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ६७. | एमपीडी.बीसी.क्र .३१३/०७.०१.२७९/२००८-०९ दिनांक डिसेंबर ६, २००८ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ६८. | एमपीडी.बीसी.क्र .३१५/०७.०१.२७९/२००८-०९ दिनांक जानेवारी २, २००९ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ६९. | एमपीडी.बीसी.क्र .३१९/०७.०१.२७९/२००८-०९ दिनांक मार्च ४, २००९ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ७०. | एमपीडी.बीसी.क्र .३२१/०७.०१.२७९/२००८-०९ दिनांक एप्रिल २१, २००९ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ७१. | एमपीडी.बीसी.क्र .३२८/०७.०१.२७९/२००९-१० दिनांक मार्च १९, २०१० | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ७२. | एमपीडी.बीसी.क्र .३३१/०७.०१.२७९/२००९-१० दिनांक एप्रिल २०, २०१० | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ७३. | एमपीडी.बीसी.क्र .३३३/०७.०१.२७९/२०१०-११ दिनांक जुलै २, २०१० | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ७४. | एमपीडी.बीसी.क्र .३३५/०७.०१.२७९/२०१०-११ दिनांक जुलै २७, २०१० | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ७५. | एमपीडी.बीसी.क्र .३३६/०७.०१.२७९/२०१०-११ दिनांक सप्टेंबर १६, २०१० | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ७६. | एमपीडी.बीसी.क्र .३३८/०७.०१.२७९/२०१०-११ दिनांक नोव्हेंबर २, २०१० | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ७७. | एमपीडी.बीसी.क्र .३४०/०७.०१.२७९/२०१०-११ दिनांक जानेवारी २५, २०११ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |

| | | |
|---|---|---|
| ७८. | एमपीडी.बीसी.क्र .३४१/०७.०१.२७९/२०१०-११ दिनांक मार्च १७, २०११ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ७९. | एमपीडी.बीसी.क्र.३४३/०७.०१.२७९/२०१०-११ दिनांक मे ३, २०११ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ८०. | एमपीडी.बीसी.क्र.३४४/०७.०१.२७९/२०१०-११ दिनांक जुन १६, २०११ | स्थायी लिक्विडिटी सुविधा बँकेसाठी आणि प्रायमरी डीलर्स |
| ८१ | एमपीडी.बीसी.क्र. ३४५/०७.०१.२७९/२०११-१२ दिनांक जुलै १, २०११ | एक्सपोर्ट क्रेडिट रिफायनान्स सुविधा |
| ८२ | एमपीडी.बीसी.क्र.३४७/०७.०१.००१/२०११-१२ दिनांक जुलै २६,२०११ | बँका व प्राथमिक डीलर्ससाठी स्थायी तरलता सुविधा |
| ८३ | एमपीडी.बीसी.क्र.३४८/०७.०१.२७९/२०११-१२ दिनांक सप्टेंबर १६, २०११ | बँका व प्राथमिक डीलर्ससाठी स्थायी तरलता सुविधा |
| ८४ | एमपीडी.बीसी.क्र. ३५०/०७.०१.२७९/२०११-१२ दिनांक ऑक्टोबर २५, २०११ | बँका व प्राथमिक डीलर्ससाठी स्थायी तरलता सुविधा |
| ८५ | एमपीडी.बीसी.क्र. ३५४/०७.०१.२७९/२०११-१२ दिनांक एप्रिल १७, २०१२ | बँका व प्राथमिक डीलर्ससाठी स्थायी तरलता सुविधा |
| ८६ | एमपीडी.बीसी.क्र. ३५५/०७.०१.२७९/२०११-१२ दिनांक जुन १८, २०१२ | एक्सपोर्ट क्रेडिट रिफायनान्स सुविधा (ईसीआर) ह्यावरील महापरिपत्रक : शिथिलता |
| ८७. | एमपीडी.बीसी.क्र. ३५६/०७.०१.२७९/२०१२-१३ दिनांक जुलै २, २०१२ | एक्सपोर्ट क्रेडिट रिफायनान्स सुविधा |
| ८८. | एमपीडी.बीसी.क्र. ३५९/०७.०१.२७९/२०१२-१३ दिनांक जानेवारी, १४, २०१३ | विशेष निर्यात कर्ज पुनर्वित्त सुविधा |
| ८९. | एमपीडी.बीसी.क्र. ३६१/०७.०१.२७९/२०१२-१३ दिनांक जानेवारी २९, २०१३ | बँका व प्राथमिक डीलर्ससाठी स्थायी तरलता सुविधा |
| ९०. | एमपीडी.बीसी.क्र. ३६२/०७.०१.२७९/२०१२-१३ दिनांक मार्च १९, २०१३ | बँका व प्राथमिक डीलर्ससाठी स्थायी तरलता सुविधा |
| ९१. | एमपीडी.बीसी.क्र. ३६४/०७.०१.२७९/२०१२-१३ दिनांक, मे ३, २०१३ | बँका व प्राथमिक डीलर्ससाठी स्थायी तरलता सुविधा |